# महाराष्ट्र विधानसभा

**पहिले अधिवेशन, २०२६**

**सन २०२६-२७ च्या अर्थसंकल्पीय मागण्या**

**माननीय अध्यक्षांनी मान्य केलेल्या कपात सूचनांची यादी**

**गुरुवार, दिनांक १२ मार्च, २०२६**

## अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण विभाग

**कपात सूचनांची एकूण संख्या - ७**

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | **मागणी क्रमांक: एम-२**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २४०८, अन्न साठवण व वखार**<br>**रूपये:- ८,००,८१,८१,०००/-**<br>**श्री. अनंत (बाळा) नर** |
| (१) | १४५१ | १०० | जोगेश्वरी पूर्व विभागातील बिंबीसार नगर (गोरेगाव पूर्व) येथील म्हाडा मुंबई मंडळाच्या जागेत शिधावाटप कार्यालय २६ ड आणि २७ ग ची व्यवस्था एकत्र करणे शिधावाटप कार्यालय २६ ड सध्या अंधेरी पूर्व येथील चकाला इंडस्ट्रियल एरिया (MIDC), रोड नं. ७ येथे कार्यरत असणे व २७ ग चे शिधावाटप कार्यालय २७ ग हे सध्या गोरेगाव पश्चिम येथील समाज कल्याण हॉल, उन्नत नगर क्र. १, तीन डोंगरी येथे स्थित असणे बिबीसार नगर, गोरेगाव पूर्व येथे म्हाडाच्या इमारत क्र. ३२ मधील शॉपिंग कॉम्प्लेक्सच्या जागा उपलब्ध असणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. रामदास मसराम** |
| (२) | १३७७ | १० | शासनाच्या रेशन पुरवठा करणाऱ्या दुकानांवर ई-प्रणाली सुरु असून दुर्गम भागातील लाभार्थी रेशन दुकानावर ई-केवायसी प्रणाली पासून वंचित असून दुर्गम भागातील लोकांना वेळेवर रेशन मिळणेबाबत, शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. संजय मेश्राम** |
| (३) | १४३२ | १० | पूर्वी शासनामार्फत रेशन दुकानांवरून नियमित धान्याव्यतिरिक्त सणासुदीच्या काळात “आनंदाचा शिधा” संच अल्प दरात नागरिकांना देण्यात येत होता. या योजनेअंतर्गत साखर, रवा, चणाडाळ, तेल इत्यादी जीवनावश्यक वस्तू अत्यल्प दरात उपलब्ध करून दिल्या जात होत्या. त्यामुळे गरीब व सर्वसामान्य कुटुंबांना मोठा दिलासा मिळत होता. परंतु सध्या शासनाने ही योजना बंद केल्यामुळे सर्वसामान्य नागरिकांमध्ये नाराजी आहे. वाढत्या महागाईच्या पार्श्वभूमीवर ही योजना अत्यंत उपयुक्त ठरत होती. तरी शासनाने पूर्वीप्रमाणे रेशन दुकानांमार्फत “आनंदाचा शिधा” योजना तात्काळ पुन्हा सुरू करावी. सणासुदीपुरतीच नव्हे तर वर्षातून किमान दोन ते तीन वेळा हा संच उपलब्ध करून द्यावा, या योजनेसाठी |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | आवश्यक तरतूद पुरवणी मागणीमध्ये करावी. गरीब व कष्टकरी जनतेच्या हितासाठी ही योजना पुनश्च सुरू करणे अत्यावश्यक आहे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (४) | १४३४ | १० | उमरेड मतदारसंघातील तालुका उमरेड तसेच भिवापूर व कुही तालुक्यातील अनेक पात्र लाभार्थी नागरिकांचे रेशन कार्ड तांत्रिक कारणांमुळे किंवा पडताळणी प्रक्रियेमधील त्रुटींमुळे बंद करण्यात आले आहेत. परिणामी, अनेक गरीब व गरजू कुटुंबांना सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत मिळणाऱ्या धान्याचा लाभ मिळत नाही, ही बाब अत्यंत गंभीर असून अन्नसुरक्षा योजनेच्या उद्दिष्टालाच बाधा आणणारी आहे. शासनाच्या विविध कल्याणकारी योजनांचा लाभ घेण्यासाठी रेशन कार्ड हा अत्यावश्यक दस्तऐवज असल्यामुळे संबंधित कुटुंबांना इतर योजनांपासूनही वंचित राहावे लागत आहे.तरी, माझी शासनाकडे मागणी आहे की उमरेड, भिवापूर व कुही तालुक्यातील बंद करण्यात आलेल्या रेशन कार्डांची तात्काळ विशेष पडताळणी मोहीम राबवावी.पात्र लाभार्थ्यांची रेशन कार्डे त्वरित पूर्ववत करण्यात यावीत.तांत्रिक त्रुटी किंवा आधार संलग्नीकरणातील अडचणीमुळे वंचित राहिलेल्या नागरिकांना तात्पुरता धान्यपुरवठा करण्यात यावा. भविष्यात अशा प्रकारे पात्र लाभार्थी वंचित राहू नयेत यासाठी स्पष्ट मार्गदर्शक सूचना व कार्यपद्धती जाहीर करावी, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (५) | १४३८ | १० | उमरेड विधानसभा मतदारसंघासह संपूर्ण राज्यामध्ये राबविण्यात आलेली शिवभोजन थाळी योजना ही सर्वसामान्य, कष्टकरी, मजूर व गरजू नागरिकांसाठी अत्यंत महत्त्वाची योजना होती. अल्प दरात पौष्टिक भोजन उपलब्ध करून देणारी ही योजना राज्यातील लाखो नागरिकांसाठी दिलासा देणारी ठरली होती. मात्र सद्यस्थितीत ही योजना प्रत्यक्षात बंद अवस्थेत असून अनेक केंद्र चालक व संबंधित दुकानदारांचे शासनाकडील देयक मोठ्या प्रमाणात प्रलंबित आहेत. त्यामुळे संबंधित व्यावसायिकांना आर्थिक अडचणींना सामोरे जावे लागत आहे. शासनाकडून वेळेत अनुदान व अनुदानाची रक्कम न मिळाल्यामुळे अनेक केंद्रे बंद पडली आहेत. तरी शासनाकडे माझी मागणी आहे की मुंबईसह संपूर्ण राज्यातील शिवभोजन केंद्रांचे प्रलंबित देयक तात्काळ अदा करण्यात यावे.योजना नियमितपणे पुन्हा सुरू करण्यासाठी आवश्यक निधीची तरतूद चालू अर्थसंकल्प/पुरवणी मागणीत करण्यात यावी. केंद्र चालकांना अनुदान वितरणासाठी पारदर्शक व वेळबद्ध यंत्रणा तयार करण्यात यावी. योजना पूर्ववत प्रभावीपणे राबविण्याबाबत स्पष्ट शासन निर्णय जाहीर करण्यात यावा. गरजू व कष्टकरी जनतेच्या हितासाठी तसेच केंद्र चालकांचे आर्थिक नुकसान टाळण्यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | **श्री. सुनील राऊत** |
| (६) | १३५६ | १० | ईराण अमेरिकेमधील सुरु असलेल्या युध्दाचे पडसाद राज्यातील व्यवसायावर, घरगुती गॅसवर, शेतक-यांच्या मालावर पडणे, तसेच सदर युध्दामुळे गॅस पुरवठ्यावर परिणाम होऊन गॅसच्या वाढलेल्या किंमती त्यामुळे सामान्यांच्या खिशाला कात्री लागत असल्याने सर्वसामान्यांमध्ये प्रचंड असंतोष व गॅसच्या वाढत्या किंमतीवर नियंत्रण आणण्यासाठी शासनाने ठोस पावले उचलण्याची नितांत आवश्यकता, याबाबत राज्य शासनाने केंद्र शासनाशी समन्वय साधून करावयाची कार्यवाही व उपाययोजना " |
| | | | **मागणी क्रमांक: एम-४**<br>**मुख्य लेखाशीर्ष: ४४०८, अन्न साठवण व वखार यांवरील भांडवली खर्च**<br>**रूपये:- १६,६१,६१,१६,०००/-**<br>**श्री. संजय मेश्राम** |
| (७) | १४३९ | १० | उमरेड विधानसभा मतदारसघातील भिवापूर, कुही व उमरेड या तालुक्यात धान्य उत्पादन मोठ्या प्रमाणावर केले जाते. अनेक शेतकऱ्यांनी शासनाकडे आपले धान्य नोंदणी करून दिले असूनही शासनाकडून त्यांचे धान्य वेळेवर खरेदी केले गेलेले नाही. यामुळे शेतकऱ्यांना आर्थिक ताण सहन करावा लागत असून अनेक शेतकऱ्यांना कर्जाची अडचण निर्माण झाली आहे. काही अधिकारी सांगतात की शासनाने धान्य खरेदीचे उद्दिष्ट कमी ठेवले आहे किंवा योग्य नियोजन झालेले नाही. परिणामी शेतकऱ्यांचे उत्पादन शासनाच्या यादीत समाविष्ट होऊनही त्यांना योग्य तो दर मिळत नाही. म्हणून शासनाने उमरेड विधानसभा मतदारसंघातील भिवापूर, कुही व उमरेड तालुक्यातील धान्य उत्पादक शेतकऱ्यांचे धान्य तातडीने खरेदी करून त्यांना त्यांच्या पिकाचे योग्य मूल्य मिळावे, तसेच भविष्यात अशी परिस्थिती पुन्हा निर्माण होऊ नये, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |

---

**विधान भवन** — **डॉ. विलास आठवले,**
**मुंबई,** — **सचिव-३,**
**दिनांक : ११ मार्च, २०२६** — **महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

**याची प्रत :**

(१) मंत्री व राज्यमंत्री
(२) विधानसभेचे सर्व सदस्य.
(३) अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण विभाग
(४) संसदीय कार्य विभाग.
(५) वित्त विभाग.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई